महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,
नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : collectorpalghar@gmail.com

**वाचले:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ व ५१ (b)
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र/करोना-२०२०/ प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

क्र/जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/उद्योगव्यवसायबंद/आदेश/कावि- २९० /२०    दि.१४/०३/२०२०

**आदेश**

ज्याअर्थी उपोद्‌घातातील अ.क्र.२ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्‌घातातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्याअर्थी मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व उद्योग आस्थापनांना सुचित करण्यात येते की, ज्या उद्योग आस्थापनांमध्ये Information Technology., Information Technology Enable Services, Service Industries आणि इतर उद्योग क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांना स्वत:च्या निवासस्थानातून त्यांचे कार्यालयीन कामे करणे शक्य आहे, आणि त्यामुळे संबंधित उद्योग आस्थापनेच्या उत्पादन, सेवा आणि दैनंदिन कामकाजावर काहीएक परिणाम होणार नसेल तर अशा उद्योग आस्थापनांना या व्दारे जाहिर आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी यांना दि.३१/०३/२०२० पर्यंत त्यांचे निवास स्थानातून कार्यालयीन कामे करणेबाबत आपल्या स्तरावरुन योग्य ते निर्देश दयावेत.

सदरचा आदेश आज दि.१४/०३/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/--**
**(डॉ.कैलास बा.शिंदे)**
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत:-**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार कॉम्प्लेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई-४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

६) उपविभागीय अधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

७) तहसीलदार वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

८) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

९) सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांचे कार्यालय,१ ला मजला, मंगेश भुवन, अंबाडी रोड, वसई (प.), ता.वसई, जि.पालघर

२/- उपरोक्त सुचनांप्रमाणे आपले स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१०) कामगार उप आयुक्त, एम.आय.डी.सी. कर्मचारी वसाहत, तारापूर-बोईसर रोड, बोईसर (प.), ता.जि.पालघर

२/- उपरोक्त सुचनांप्रमाणे आपले स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

११) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, संखे कॉलनी, आर्यन शाळेच्या मागे, लोकमान्यनगर रोड, पालघर (प.), ता.जि.पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१२) उप अभियंता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ, टाकीनाका, एमआयडीसी, बोईसर

२/- उपरोक्त सुचनांप्रमाणे आपले स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१३) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

जिल्हाधिकारी पालघर तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन
प्राधिकरण, पालघर